नवोपक्रम सन : २०२१- २०२२

# “अशी घडली मुले.”



स्पर्धेचा गट

पूर्व प्राथमिक गट

(गट क्रमांक १ )

शिक्षिका नाव

**सौ. भाग्यश्री महेश कोळेकर**

सरस्वती शिशुवाटिका, कराड

जनकल्याण प्रतिष्ठान संचलित,

सरस्वती शिशुवाटिका, कराड

तालुका – कराड

जिल्हा – सातारा

# अनुक्रमणिका


१. नवोपक्रम शीर्षक

२. शिक्षक माहिती.

३. असा माझा उपक्रम

४. नवोपक्रम गरज व महत्व

५.नवोपक्रमांची उद्दिष्ट

६. नवोपक्रम नियोजन

७.नवोपक्रम फोटो/अभिप्राय

८.नवोपक्रम कार्यपद्धती

९.नवोपक्रम यशस्विता व फलनिष्पती

१०.समारोप

११.संदर्भसूची व परिशिष्टे


अशी घडली मुले



## 2.शिक्षक माहिती

**१) नवोपक्रम शीर्षक**

# 'अशी घडली मुले."

**- उपक्रम राबविलेला वर्ग -**

**पूर्व प्राथमिक विभाग- जाई मोठा गट**

**स्पर्धेकाचे नाव**



**सौ. भाग्यश्री महेश कोळेकर**

पत्ता- 182,क शनिवार पेठ, कराड,

तालुका : कराड जिल्हा-सातारा,

मोबाइल नंबर - ८५३०५१७१०७ / ७२४९७७९१११

जन्म तारीख - २०/०६/१९८४

Email- bhagyashrikolekar1117@gmail.com

शैक्षणिक पात्रता- B.A. D.Ed बालवाडी प्रशिक्षणसेवा कालावधी - १२ वर्षे

शाळेचे नाव

जनकल्याण प्रतिष्ठान संचलित,

सरस्वती शिशुवाटिका कराड, (मंगळवार पेठ)

पूर्व प्राथमिक विभाग

जाई मोठा गट

# उपक्रमाची माहिती

## 3. असा माझा उपक्रम

**समस्येची जाणीव –**

शाळेच्या पहिल्या दिवशीचे चित्र मुले गेटमधून आत येताना प्रत्येक पालकांच्या पाटीला दप्तर होते. काही पालकांनी आपल्या मुलाला उचलून घेतल होते. वर्गात मुलांना सोडल्यावर दप्तर, चप्पल, पालकांनी स्वतः जागेवर ठेवले व मुलांना हे तुझ दप्तर आहे. यादप्तराममध्ये डब्बा, बाटली पुढच्या कप्प्यात रुमाल  इत्यादी वस्तू आहेत. वर्गात सर्व मुले एकमेकांकडे बघत होती. या बाई, हि मुले, हे मित्र मोबाईलवर रोज तासाला दिसत होती. ते सगळे आज  प्रत्यक्ष दिसायला लागल्यावर मुले सभ्रम अवस्थेत होती. मुलांशी आम्ही बोलत होतो पण मुल काहीच बोलत नव्हती. एकमेकांशीही बोलत नव्हती. मुलांना वर्गात गाणी सांगू लागलो तरी मुले म्हणत नव्हती. ऑनलाईन तासाला खुप गप्पा मारायचीत मग मुलांना आम्ही मैदानावर खेळायला सोडल तर लगेच मुल दमून जात होती . खेळायला दिलेल्या वस्तू मुले हातात घेऊन बसत होती वस्तू दुसऱ्याला देत नव्हती. मुलांना पळायला लावल्यावर बाई बास की, वर्गात जाऊया असे म्हणत होती. आई बाबा कधी येणार असे म्हणू लागली. पंधरा दिवसाचा अभ्यास केल्यावर मुलांच्यात वरिल समस्या वारंवार दिसून आल्या कदाचित या समस्या कोरोना काळात घराबाहेर न पडल्यामुळे झाल्या असाव्यात. असे लक्षात आले .

### मला अढळलेल्या वर्तनसमस्या

| | |
|---|---|
| **रागीटपणा** | **चिडखोरपणा** |
| **एकलकोंडेपणा** | **परावलंबी** |
| **स्वमत नसणे** | **लाजाळूपणा/बुजरेपणा** |
| **इतरांच्या वस्तू घेणे / वस्तू न देणे** | **आळशीपणा** |
| **चंचलता** | **सवयी / भितीमुळे नखे खाणे** |
| **उच्चार दोष** | |

## नवोपक्रम : अशी घडली मुले

| अ.क्र | विद्यार्थ्याचे नाव | रागीटपणा | चिडखोरपणा | एकलकोंडेपणा | परावलंबी | स्वमत नसणे | लाजाळूपणा/ बुजरेपणा | इतरांच्या वस्तू घेणे | आळशीपणा | चंचलता | सवयी / भितीमुळे नखे खाणे | उच्चार दोष | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | दूर्वा | | | | | | | | | O | | | |
| 2 | विहान | | | | | | | | O | | | | |
| 3 | ऋचा | | O | | | | | | | | | | |
| 4 | अविरत | | O | | | | | | | | | | |
| 5 | आरोही | | | O | | | | | | | | | |
| 6 | गार्गी | | | | | O | | | | O | | | |
| 7 | काव्या | | | | | | | | O | | | | बोलकी |
| 8 | श्लोक | | | O | | | | | | | | | |
| 9 | श्रीशा | | | | | O | | | | | | | |
| 10 | धैर्या | O | | | | | | | | | | | |
| 11 | श्राव्या | | | | | O | | | | | | | |
| 12 | राघव | | | | | | | | | | | | एकाग्रता |
| 13 | अद्वैत | | | | | | | | | | | | स्वावलंबी |
| 14 | शौर्य | | | | O | | | | | | | | |
| 15 | राजवीर | | | | | | | | | O | | | |
| 16 | श्रवण | | | | | | | O | | | | | |
| 17 | प्रभास | | O | | | | | | | | | | |
| 18 | शिवण्या | | | | | O | | | | | O | | |
| 19 | श्रीशा विभूते | | | | | | | | | O | | | |
| 20 | देवांग | | | O | | | | | | | | | |
| 21 | आरोही | | | | | | | | | | | | स्वावलंबी |
| 22 | हर्षवर्धन | | | | | | | | | | O | | |
| 23 | शिवण्या तावरे | | | | | | | | | | | | एकाग्रता |
| 24 | अर्णव पाटील | | O | | | | | | | | | | |
| 25 | शिवण्या पवार | | | | | | | | | | | | आत्मविश्वास |
| 26 | सिया | | | | O | | | | | | | | |
| 27 | चिन्मय | | | | | | | O | | | | | |
| 28 | मृणाल | | | | | | | | | | | | आत्मविश्वास |
| 29 | शौर्य | O | | | | | | | | | | | |
| 30 | धनराज | | | | | | | | | | | | स्वावलंबी |
| 31 | स्वयंम | | | | | | | | | O | | | |
| 32 | राजवीर पाटील | O | | | | | | | | | | | |
| 33 | स्वरा | | | | | | | | | | | | चांगल्या सवयी |
| 34 | ज्ञानेश | | | | | | | | | O | | | |
| 35 | शरण्या | | | | | | | O | | | | | |
| 36 | जुई | O | | | | | | | | | | | |
| 37 | विरांश | | | | | | | | O | | | O | |
| 38 | स्पृहा | | | | O | | | | | | | | |
| 39 | शालवी | | | | | | | | O | | | | |
| 40 | शौर्यनील | | | | | | O | | | | | | चांगल्या सवयी |
| 41 | शिवराज | | | | | | | | | | | O | |
| 42 | देवराज | | | | | O | | | | | | | |
| 43 | वेदस | | | | | | | O | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

**मी केलेले उपाय -**

मी वरील समस्या निश्चित केल्या व यावर उपाय करून मुलांच्यात एकाग्रता, ऐकण्याची सवय, शांत बसण्याची सवय, स्वावलंबन, वस्तू जागेवर ठेवणे, बोलकी होणे, उच्चार दोष कमी करणे व मुलांचा शारीरिक, मानसिक, बौध्दीक या शिवाय मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा. यासाठी खालील उपाय केले.

**एकाग्रता :-** शांतीपाठ, ओमकार आवाज न करता वस्तू उचलणे, काडीने बांगड्या उचलने, आवाज न करता वस्तू उचलणे, दिव्याकडे एक टक बघत बसणे.

**उच्चार दोष :-** विठ्ठल योग, वेगवेगळे आवाज ओळखणे, वारंवार शब्द उच्चारणे.

**मैदानावरील खेळ :-** उड्यामारणे, हास्याचे प्रकार, टाळयांचे प्रकार, सरळ रेषेवर चालणे, वेडीवाकडी वळणावर चालणे, विटावरून चालणे.

**जोडीचे खेळ :-** बॉलचा समतोल राखणे, दोंघाची दोरउड्या मारणे, एका रिंगातून चालणे. पाच जणांमध्ये चित्र पूर्ण करणे, दोघांनी मिळून पेनाचे झाकण लावणे, बाटलीचे झाकण लावणे.

**इतरांच्या वस्तू घेणे - न देणे : -** वस्तू ओळखणे, दप्तर, पट्ट्या, बॉटल, टोप्या, स्पंज, डब्या, चप्पल इत्यादी वस्तू स्वतःची व दुसऱ्याची ओळखणे.

**लाजरे - बुजरेपणा :-** गप्पा मारणे, दुसऱ्या पालकांशी गप्पा मारणे. कृती ओळखणे, योग्य-अयोग्य चांगल्या सवयी लावणे.

**बैठे खेळ :-** १० खेळ मांडलेले त्यातून आवडीचे खेळ खेळणे. भांडीकुंड, बॅटबॉल, पाटिपेन्सील, चित्रकला साहित्य, बाटलीने बॉल पाडणे, रिंग टाकणे, बांगडीला लोकर गुंडाळणे सुपाऱ्यापासून चित्र बनवणे, शिवाजी म्हणतात. सिग्नल सिग्नल खेळ, मातीकाम - गोळा बनवणे, वस्तू बनवणे, किल्ला बनवणे.

या खेळामुळे एकाजागी बसण्याची सवय लागते. एकाग्रता, जिंकण्याची धडपड, बुद्धीला चालना, मोबाईल पासून दूर, यशस्वीतेसाठी धडपड, अपयश पचवण्याची ताकद वाढते. लक्ष केंद्रीत होते.

इत्यादी उपाय केले. त्यामुळे मुलांच्यात एकाग्रता व सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली .

# ४. नवोपक्रम गरज व महत्व

ओल्या मातीसारखी असणारी ही लहान मुले जशी घडवावी तशी घडतात .परंतु त्यांना हसत खेळत आनंददायी शिक्षण मिळाले पाहिजे. तसेच या वयात मुलांचा सर्वांगीण विकास व वाढ होणे गरजेचे असते. बालकांच्या भोवती असणारे वातावरण परिस्थिती दोन्ही घटक 'बालकांच्या शिक्षणावर परिणाम करत असतात. तसेच अलिकडच्या काळात विभक्त कुटुंब पद्धतीमुळे मुले एकलकोंडी, हट्टी लाजरी, बुजरी, चढाओढ, भांडण, असहकाराची भावना, आक्रमकता, मोबाईल व टिव्हीचा जास्त वापर, तसेच आकांडतांडव करणारी आहे. अश्या समस्या कमी करण्यासाठी तसेच बालकाची एकाग्रता वाढीसाठी व मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा व उदयाचा भावी नागरिक सुद्रुढ, समृद्ध असावा. म्हणून हा माझा विचार नवोपक्रम निवडण्यात माझी खरी गरज ठरला.

## नवोपक्रमाचे महत्व –

१. बाल्यावस्था हि सर्वात महत्वाची अवस्था आहे. या वयातच मुलांची वाढ व विकास होत असतो. हा विकास होत असताना मुलांच्यामध्ये वर्तन समस्या निर्माण झाल्यातर मुलांचा विकास होण्यावर परिणाम होत असतो. यावर उपाय करून या समस्या कमी करणे महत्त्वाचे आहे .

२ . काही वेळेस परिस्थिती नुसार मुलांमध्ये होणारे बदल आपल्या लक्षात येतात. हे बदल लक्षात आल्यावर योग्य उपाय योजना करणे आवश्यक असते. यांमध्ये ३ ते ६ वयोगटातील बालकांच्या मानसिकतेचा विचार करून योग्य तो सकारात्मक पध्दत अवलंबणे आवश्यक असते. यातून मुलांचा भावनिक, शारीरिक , बौध्दीक , मानसिक व सर्वांगीण विकास होणे महत्त्वाचे आहे .

३ . मुलांचा ९०% विकास या बाल वयात होत असतो जर मुलांमध्ये चिडचिडेपणा, रागीटपणा, एकोलकोंडेपणा, चंचलता, परावलंबन इ. वर्तन समस्या असतील तर मुलांचा बुद्धिचा विकास होण्यास अडथळे निर्माण होतील. म्हणून या समस्या कमी करून त्यावर उपाय म्हणून खेळाद्वारे, क्रियाकलापद्वारे, उपक्रमाद्वारे मुलांच्यात एकाग्रता निर्माण करणे महत्वाचे आहे .

## गरज

- मुले एकटीच असल्यामुळे मुलांना घरात खेळायला कोणी नाही. व मुलांना बाहेरही खेळायला पाठवत नव्हते असे लक्षात आले .

- मुले एकटीच असल्यामुळे मुलांना मागेल ती गोष्ट देत होते त्यांचे लाड जास्त प्रमाणात होत होते.
- घरात सर्व कामाला मदतनिस असल्यामुळे मुलांना शिस्त, श्रमाची सवय, स्वावलंबन अजिबात नव्हती .
- सतत सारख टि.व्ही. मोबाईल पहात असल्यामुळें वागण्यात, बोलण्यात, खेळण्यात जास्त प्रमाणात बदल जाणवला.
- मुलांमध्ये आळशीपणा चंचलता जास्त जाणवला त्यामुळे हा उपक्रम करणे मला गरजेचे वाटले .

## उपक्रमाचे कारण

- मुलांच्यातील समस्या कमी करून मुलांचा शारीरिक, मानसिक, बौद्धीक, सर्वांगीण विकास करणे.
- बालमनाची जडणघडण याच वयात होत असते.
- मुलांना स्वावलंबी बनवणे .
- मुलांना चांगल्या सवयी लावणे .
- मुलांच्यातील भितीची भावना कमी करणे
- मुलांच्यातील चंचलता, अस्थिरता, आळशीपणा, एकलकोंडेपणा कमी करणे उपक्रमाचे मुख्य कारण आहे.
- मुलांना आवडीचे खेळ निवडण्याची संधी दिल्यामुळे शाळेत मुलांशी व बाईंनी सुसंवाद करत जवळीक साधली तर ही मुले स्वतः बद्दलचे मत व स्वतः ची आवड सांगू लागतात .
- मुलांच्यातील उच्चार सुधारणे, बोलके करणे .
- उद्याची चांगली पिढी घडवणे.

## नवोपक्रमाचे वेगळेपण

- कोरोना संकटानंतर मुले पहिल्यांदा शाळेत येणार होती. त्यांना पुन्हा शाळेच्या प्रवाहात आणले.
- मला या समस्या जाणवल्या व यावर मी घेतलेले उपक्रम समस्याचे निराकरण होऊन अशी मुले घडली.
- या उपक्रमाच्या माध्यमातून मुले स्वावलंबी, एकाग्र बनली.
- मुलांचा शारीरिक, मानसीक, बौध्दिक, भावनिक विकास झाला.
- या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना वस्तू जागेवर ठेवण्याची सवय लागली.
- मुलांच्यातील लाजरे बुजरेपणा, एकलकोंडेपणा नाहीसा झाला.
- मुलांना आईचे कष्ट व पदार्थातील पौष्टिकता समजल्याने मुले आवडीने रोज न सांडता डब्बा खाऊ लागली.
- मी शालेय अभ्यासक्रमाबरोबर नवनविन खेळ उपक्रमाद्वारे चांगल्या सवयी मुलांमध्ये रुजल्या.
- मुलांच्यात झालेले बदल पाहून शाळेबद्दल चांगले मत निर्माण झाले.
- काही मुले मातीत खेळायला, चालायला तयार नव्हती त्यामुलांनी मातीच्या छान वस्तू, किल्ला बनविला.
- मुलांचे उच्चार स्पष्ट नव्हते. चोचरे बोलायचे, बोलत नव्हती ती मुले बोलकी झाली व छान बोलू लागली.
- बाई बरोबर पालकां बरोबर गप्पा मारणे स्तुती करणे यामुळे मुलांच्यातील लाजरे बुजरेपणा कमी होण्यास मदत झाली.
- मुलांच्यात सकारात्मक बदल झाले व ठळकपणे दिसलेही.
- मुलांच्यात उच्चार दोष कमी होण्यास मदत झाली.

## विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून उपयुक्तता :

- मी घेत असलेल्या उपक्रमामुळे मुलांना शाळेत बसायची सवय लागावी.
- मुले बोलकी व एकाग्र व्हावीत.
- मुलांना आज बाई कोणता नवीन खेळ घेणार आहेत ? याची उत्सुकता वाढू लागली.
- दुसऱ्यांच्या वस्तू घेऊ नये हा संस्कार मुलां मध्ये रुजणे स्वतःच्या वस्तु मुले ओळखून घरी घेऊन जावीत.
- विविध आवाज ऐकण्यामुळे लक्ष्य देऊन ऐकण्याची सवय लागावी.
- मुले एकमेकांना मदत करू लागली व सहकार्याची भावना वाढीस लागली.
- मुलांना एका जागी बसण्याची सवय लागावी, मुलांना शाळेची आवड निर्माण व्हावी.
- कोरोना नंतर शाळा कशी असेल मुले बसतिल का? व आम्ही पण एवढा वेळ घेऊ शकू का? ह्याची उत्सुकता होती. याच्यावरही या उपक्रमाद्वारे मात करू शकलो.

# ५.नवोपक्रमांची उद्दिष्ट

## हा उपक्रम मी का करते आहे.

- मुले शाळेत येऊ लागली तेव्हा मुलांच्या मध्ये समस्या दिसून आल्यामुळे या समस्यावर उपाय करून मुलांना एकाग्र करून मुलांचा सर्वांगीण विकास करणे. हे मुख्य उद्दिष्ट आहे.
- पहिल्या दिवशी मुले एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागली.
- पालकांच्या पाठिला दप्तर हे पहिल्या दिवशीचे चित्र होते. हे चित्र बदलणे व मुलांना स्वावलंबी बनवणे.
- त्यांच्यातील समस्या दूर करण्यासाठी शांतीपाठ, खेळाद्वारे त्यांच्यातील समस्याचे निराकरण करणे हे नवोपक्रमाचे उद्दिष्ट आहे.
- कोरोना नंतरचा काळ हा आमच्याकडे समस्याच होती पण संधी म्हणून त्याकडे पहाणे व सर्वांगीण विकास करणे हा नवोपक्रमाचा उद्देश होता.
- विविध खेळातून रागीटपणा, एकलकोंडेपणा, चिडकोरपणा कमी करणे.
- सहकार्याची भावना वाढीस लावणे.
- गप्पा मारणे, स्तुती करण्यामुळे मुलांच्यातील लाजरे बुजरेपणा कमी करणे.
- मुलांच्या एकाग्रतेतून, खेळातून मुलांचा सर्वांगीण विकास होतो हे पालकांना सांगणे.
- स्वतःच्या वस्तु घेणे व दुसऱ्याची वस्तू परत देणे हा संस्कार मुलांच्यात रुजवणे व त्यातून मुलांची निरिक्षण शक्तीत वाढ करणे.
- एखाद्या मुलाने डब्बा आणला नाही तर सर्वांच्या डब्यातील घास घास देऊनी सहकार्याची भावना वाढीस लावणे.
- मुलांना मातीचे गोळे, वस्तु, किल्ला बनवायला दिल्याने मुलांना पंचमहाभुतांची अनुभूती देणे.
- मुलांच्यातील चोचरेपणा, लाजरेबुजरेपणा, एकलकोंडेपणा, कमी करून मुलांना बोलके करणे व उच्चार दोष कमी करणे.

## उपक्रमाचा फायदा कोणाला –

### विद्यार्थ्यांना

- मुलांच्यात एकाग्रता निर्माण झाल्यामुळे मुलांचे शिकण्याकडे लक्ष लागू लागले.
- मुलांच्यातील लाजरेबुजरेपणा कमी होऊन मुलांच्यात आत्मविश्वास वाढू लागला.
- मुले स्वतःच्या वस्तू व घरातील वस्तू जागेवर ठेवू लागली. घरातील सर्वांनाही वस्तू जागेवर ठेवण्यास सांगू लागली. मुले स्वावलंबी बनली.
- आवडीचे खेळ खेळायला दिल्याने मुलांच्यात आनंद व उत्साह निर्माण झाला.
- मुले बोलकी झाली.
- मुलांच्यातील वर्तन समस्या कमी होऊन मुलांच्यात एकाग्रता निर्माण झाली.
- मुले पूर्ण डब्बा संपवू लागली.
- मुलांच्यातील संभ्रम अवस्था दूर झाली.
- मुलांच्यात सहकार्याची भावना निर्माण झाली.
- मातीत न खेळणाऱ्या मुलांनी छान किल्ला केला.

### पालकांना

- घरातील कामामध्ये मुले मदत करू लागली.
- मुले घरी स्वतः व पालकांनाही शुभंकरोती, ओमंकार करण्यास सांगू लागली. त्यामुळे मुलांच्यात एकाग्रता वाढू लागली.
- मुलांच्यातील छोट्या छोट्या कृतीतून संस्कार दिसू लागले.
- इतर मुलांपेक्षा आपल्या मुलात बोलण्यात, वागण्यात झालेले बदल पाहून पालकांना, आपल्या शाळेत मुलांना पाठवण्याचा अभिमान वाटु लागला.
- मुलांच्यातील चांगले बदल पालक जवळून पहात होते आणि वेळोवेळी मुलांचे कौतुक करत होते.
- मुले नातेवाईकांना, शेजाऱ्याना शाळेत बाईंनी शिकविलेल्या गोष्टी सांगू लागली. त्यांच्या वागण्या बोलण्यातून चांगले बदल दिसू लागले. त्यामुळे आपल्या मुलांना या शाळेत पाठवल्याचे सार्थक व समाधान झाले.

## शिक्षकांना -

- कोरोनानंतर मुलांना शाळेत शिकवणे हा नविन अनुभव मिळाला.
- मुलांच्यातील वर्तन समस्या कमी आल्याने मुलांचा विकास होण्यास मदत झाली. मुले सर्वांचे ऐकू लागली. बोलू लागली. परीक्षेला छान पटपट उत्तरे देऊ लागली. वर्गाची गुणवत्ता वाढली.
- पालकांचा विश्वास माझ्या अध्यापनावर वाढला.
- मला बऱ्याच नवनवीन गोष्टी या उपक्रमाद्वारे शिकायला अनुभवायला मिळाल्या.
- मुलांशी नाते तयार झाले.
- शिक्षक म्हणून समस्यांवर मात करायला शिकले.

## शेजाऱ्यांना / मित्रांना -

- सहकार्य भावना वाढली.
- मित्रत्व कळले. मैत्रीची जाणीव झाली.
- या मुलांच्यावर झालेले संस्कार आपल्या मुलामध्ये ही व्हावेत यासाठी पालक प्रयत्न करू लागले. आपल्या मुलांना ही त्या शाळेत शिकवावे असे त्यांना वाटू लागले.
- एकमेकांचे ऐकू लागली मदत करू लागली.

## शाळेला -

- मुलांमध्ये झालेल्या बदलामुळे शेजारची नातेवाईकांची मुले आमच्या शाळेत प्रवेश घेऊ लागली.
- शाळेचा नावलौकीक वाढला.

## पूर्णवर्गाला -

- माझ्याकडे असणाऱ्या जाई मोठया गटाला हा उपक्रम मी केला त्याचा फायदा जाई गटाला झाला.
- या नवोपक्रमामुळे मुलांनी उपक्रमाचे केलेले फोटो ग्रुपवर पाठवत असल्यामुळे इतरही मुलांना प्रेरणा मिळत होती याचा फायदा पूर्ण वर्गाला झाला .

## नवोपक्रमामधून काय व कोणासाठी साध्य होणार

- सर्व समस्यावर मात करून हसत खेळत मुलांच्या सर्वागीण विकास करतो तोच खरा शिक्षक.
- मुलांच्यात सहकार्याची भावना वाढीस लागली.
- जाईगटातील सर्व मुलांचा सहभाग असल्यामुळे मुलांच्यातील वर्तन समस्या दूर होऊन मुलांच्यात सकारात्मक बदल झाले.
- मुले स्वतःच्या वस्तू स्वतः जागेवर ठेऊ लागल्याने मूले स्वावलंबी बनली.
- या उपक्रमामुळे मुलांच्यातील लाजरे बुजरेपणा, एकलकोंडेपणा कमी झाला व मुले बोलकी, धाडसी झाली.
- वर्तन समस्या हा नवोपक्रम घेतल्यामुळे मुलांचा सर्वांगिण विकास हे धैर्य डोळयासमोर ठेवल्यामुळे शाळेचा वर्गाचा विद्यार्थ्यांचा विकास झाला.
- या उपक्रमामुळे मुलांना शाळेत येण्याची उत्सुकता वाढू लागली.
- खेळातून बऱ्याच गोष्टी मुलांना शिकविता येऊ लागल्या.
- या उपक्रमामुळे शाळा, समाज विद्यार्थी यांची प्रगती करण्यासाठी हा नवोपक्रम मदत करेल यात काही शंकाच नाही.
- मुलांना पोषक उब्बा, आहार खाण्याची सवय लावल्यामुळे मुलांचा शारीरिक, मानसिक वाढ व विकास होण्यास मदत झाली.
- मुलांच्यातील अस्थिरता, चंचलता कमी झाली.
- समस्या वर्तन समस्याचे निराकरण केल्यामुळे मुलांच्यात एकाग्रता वाढीस मदत झाली.
- सहकार्याची भावना वाढीस लागली.
- जाई गटातील सर्व मुलांचा सहभाग असल्यामुळे मुलांच्यातील वर्तन समस्या दूर होऊन मुलांच्यात सकारात्मक बदल झाले.
- या उपक्रमामुळे मुलांच्यातील लाजरे बुजरेपणा एकलकोंडेपणा, चंचलता कमी झाल्यामुळे मुले बोलकी झाली.
- वर्तन समास्या हा नवोपक्रम घेतल्यामुळे बालकांचा सर्वांगीण विकास हे धैय डोळयासमोर ठेवण्यामुळे शाळेचा, वर्गाचा विकास झाला.

**नवोपक्रम : अशी घडली मुले**

- मुलांना शाळेत येण्याची ओढ, उत्सुकता वाटू लागली.
- खेळातून बऱ्याच गोष्टी मुलांना शिकविता येऊ लागल्या.
- मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली.

# ६.नवोपक्रमाचे नियोजन

दोन वर्ष मुले कोरोना काळात घरीच राहिल्यामुळे मुलांना बाहेर जाण्याचा पर्याय नसल्याने मुले ऑनलाईन तासा व्यतिरिक्त मोबाईल वर गेम खेळणे, युट्युब वरील व्हिडीओ पाहणे तसेच सतत टिव्ही मधील कार्टून पहात बसायची. त्यांना वेळेचे बंधन रहात नव्हते त्यामुळे मुलांच्यात हळूहळू समस्या निर्माण होत गेल्या. मुले जेव्हा शाळेत यायला लागल्यावर मुलांच्यातील समस्या हळूहळू आम्हास जाणवल्या. त्यामुळे आम्ही मुलांना शिकवलेल, सांगितलेल्या गोष्टी मुलांपर्यंत पोहचत नव्हत्या. त्यासाठी समस्या दूर करून मुलांच्यात एकाग्रता वाढवून मुलांचा सर्वांगीण वाढ व विकास होण्यासाठी मी नवोपक्रमाचे नियोजन ठरवले.

## उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण -

- दोन वर्ष कोरोनाचा काळ संपत आल्यावर मुले शाळेत यायला लागल्यानंतर मुले अबोल होती, लाजत होती एकमेकांशी बोलत नव्हती मैदानावर खेळायला नेल्यावर खेळायला कंटाळा करायची.
- पालक जेव्हा मुलांना शाळेत सोडायला येत होती तेव्हा पालकच मुलांच्या वस्तू दप्तर, चप्पल, जागेवर ठेवत होती.
- मुलांच्या मधे वर्तन समस्या दिसत होत्या.
- मुले स्वतःच्या वस्तू ओळखत नव्हती.
- मुले ऐकूण घेत नव्हती. अस्थीर व चंचल होती. त्यामुळे त्यांच्यात एकाग्रता नव्हती.
- मुले कशीही, कुठही वर्गात बसत होती.
- हाताला, पायाला, माती, लागेल, घाण लागेल म्हणून मुले मातीत ग्राउंडवर खेळणी घरात खेळायला तयार नव्हती.
- मुलांच्यात पौष्टीक आहाराची कमतरता जाणवत होती.

## संबधीत व्यक्तिशी , तज्ञ यांच्याशी चर्चा :

- मुलांच्यातील येणाऱ्या वर्तन समस्या दूर करून "अशी घडली मुले" असा मी उपक्रम करणार आहे. त्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. माटे बाई यांचे मार्गदर्शन घेतले. व त्यांची नवोपक्रमासाठी वैचारिक मदत घेतली.
- नेशन बिल्डर पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित तसेच राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा 2020-21 मध्ये प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक गट द्वितीय क्रमांकाने सन्मानित शाळेचे मुख्याध्यापक श्री. विजय कुलकर्णी सर यांचे उत्तम मार्गदर्शन मिळाले.
- शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शरयु माटे बाई राज्यस्तरीय विजेत्या तसेच शाळेच्या सौ. अनुजा ग्रामोपाध्ये बाई राज्यस्तरीय तृतीय क्रमांक मिळवलेल्या तसेच सौ. अनघा कुलकर्णी बाई राज्यस्तरीय विजेत्या या तिन्ही नवोपक्रम 2021-22 च्या राज्यस्तरीय विजेत्यांचे मार्गदर्शन मला मिळाले.
- शिशुवाटीका तत्व आणि व्यवहार या पुस्तकाचा देखील अभ्यास केलामाझ्या शाळेतील सर्व सहकारी शिक्षकांशी चर्चा केली.
- शिशुवाटीका तत्व आणि व्यवहार या पुस्तकाचा देखील अभ्यास केला.

## आवश्यक साधनांचा विचार :

- मुलांच्या वर्तन समस्या दूर करण्यासाठी पहिल्यांदा समस्या निश्चित / लिहून काढल्या. त्यासाठी पालकांना पालक सभेत माहिती दिली. मुलांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर या वर्तन समस्या दूर करून विकास करता येईल.
- खेळाचे साहित्य खेळली घरातून निवडले. त्यानुसार खेळ ठरवले.
- सरस्वती ॐकार, भारतमाता फोटोप्रेम निवडल्या.
- ४३ मुलांचा WhatsApp ग्रुप केला. त्यामुळे मुले त्यांनी केलेल्या घरातील कृतींचे फोटो पाठवायला लागली.
- मुलांच्या विविध वस्तूचा वापर केला.

## करावयाच्या कृतीचा क्रम :

१. समस्या निश्चित केल्या.

२.त्यामध्ये विद्यार्थ्यांचे गट केले.

३.त्यावर काय उपाय योजना करायची याची यादी केली.

. ४.समस्या नुसार विद्यार्थ्यांची निवड केली.

५. शाळेच्या सुरुवातीला जुन महिन्यात पालकांची पालक सभा घेवून पालकांना या उपक्रमाची कल्पना, माहिती दिली व पालकांची उपक्रमासाठी मदत घेतली.

६.शांतीपाठ, शांत बसणे, ॐ कार या पासून सुरुवात केली.

. ७. मुलांना स्वतःच्या वस्तू व इतरांच्या वस्तू ओळखणे व जागेवर ठेवणे.

८. पौष्टिक आहार - डबा पालकांनी बनवून देणे.

९. मैदानी खेळ खेळायला देणे.

१०. एकाग्रता वाढीसाठी छोट्या छोट्या कृती करून घेण्यास सुरुवात केली.

११. पालकांना वेळोवेळी माहिती देणे.

१२. मुलांचे वेळोवेळी कौतुक करणे. त्यामुळे मुलांना प्रोत्साहन मिळत होते.

१३. मुलांना शाळेत आल्यावर नमस्कार, हातात हात मिळवणे, फूल देणे याची निवड करणे. यामुळे मुले वेळेत आनंदाने शाळेत येण्यास मदत झाली.

१४. मुल्यांच्या सरावामुळे, कौतुकामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. मुलांच्यातील वर्तन समस्या कमी होत होत्या. व मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होवू लागली.

१५. निट बोलणे, सिग्नल सिग्नल खेळ, स्वतःचे गुण व दोष, दुसऱ्याचे गुण व दोष, वस्तू जागेवर ठेवणे आपल्या व दुसऱ्याच्या वस्तू ओळखणे अशा दैनंदिन जीवनातील गोष्टी मुलांना शिकवल्या जात आहेत.

## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :

- वर्गातील प्रत्येक मुलांना शांतीपाठ सुरू केल्यावर सर्व मुले हळूहळू शांत डोळे मिटून बसू लागली.

**नवोपक्रम : अशी घडली मुले**

- दैनंदीन व्यवहारामध्ये मुले स्वतःची कामे स्वतः करू लागली. स्वतःची, दुसऱ्याची वस्तू ओळखू लागली. त्यामुळे दुसऱ्याची वस्तू घरी घेवून न जाता त्याला परत देऊ लागली. मुले स्वावलंबी झाली.
- मैदानी खेळामुळे मुलांमध्ये शारिरीक क्षमता वाढीस लागली. एक पाय बांधून खेळ, हात बांधून दोघांचे एकत्र गटाचे खेळ घेतल्याने मुलांच्यातील एकलकोंडेपणा कमी झाला. मुलांच्यात सहकार्याची भावना वाढीस लागली.
- पालकांशी, बाईशी, मित्रांशी गप्पा मारणे, कौतुक करणे. स्वतःचे व दुसऱ्यांचे गुण दोष सांगणे यामुळे मुलांच्यातील लाजरेबुजरेपणा कमी झाला. मुले स्वमत मांडू लागली.
- विठ्ठल योग, टाळयांचे प्रकार, हास्याचे प्रकार हया प्रकारामुळे मुलांच्या जीभेच्या स्नायुंचा विकास झाला व उच्चार स्पष्ट होण्यास मदत झाली. लाजरेबुजरेपणा कमी होऊन मुले स्वमत मांडू लागली. मुले फारसी बोलत नव्हती ती मुले बोलू लागली.
- मुलांच्यात ओंकार, शांतीपाठ दिव्याकडे एकटक पाहणे, आवाज ओळखणे यामुळे मुलांच्यातील रागीटपणा, चिडकोरपणा, चंचलता इत्यादी समस्या कमी होऊन एकात्मता वाढीस मदत झाली.
- मुलं आई बाबा सांगतील तेच ऐकत होती. स्वतःचे मत नव्हते त्यासाठी स्वःताचे गुण दोष सांगणे एका वेळी वगीत १० खेळ मांडले. १० मुले खेळायला सोडली होती, तुम्हाला आवडेल तो खेळ खेळा म्हणून सांगीतले होते. त्यावेळी मुलांनी आवडीचे खेळ निवडले पण पाटी पेन्सिल कुणी निवडली नाही. आशा प्रकारचे विविध खेळ खेळायला दिल्यामुळे त्यांच्यात स्वमत निर्माण होण्यास मदत झाली.
- दोन वर्षे कोरोनामुळे मुले घरी असल्यामुळे, घराच्या बाहेर न पडल्यामुळे कुणाच्यात एकत्र न गेल्यामुळे तसेच मैदानावर खेळायला न मिळाल्याने मुलांच्यात ज्या वर्तन समस्या झालेल्या होत्या त्या कमी करून मुलांचा सर्वागीण विकास होण्यास हा माझा नवोपक्रम फायदेशीर ठरला.
- माती खाणे, नखे कुरतडणे, अंगठा चोखणे, शु करणे या समस्या मुलांच्यातील भितीची भावना, तसेच एकटेपणा, काही मुलांना सवय असल्यामुळे तसेच रक्ताची कमतरता कॅल्शीयम चे प्रमाण कमी असल्याने वरील समस्या जाणवत होत्या. त्यावर उपाय करून

रक्तवाढ व कॅल्शियम युक्त पदार्थ व जंतनाशक गोळी दिल्याने मुलांच्यातील ही समस्या कमी झाल्या. काही मुलांच्यात शारिरीक प्रवृत्ती विषयी असणाऱ्या समस्यांचे निराकरण करता आले.

- मुलांच्यातील उच्चार दोष कमी होऊन मुलांचा भाषा विकास होण्यास मदत झाली.
- वर्तन समस्या कमी झाल्याने मुलांच्यात प्रगती झाल्याने पालकांनाही खूप आनंद झाला.
- मुलांच्या परिक्षेच्या वेळी मुलांनी न घाबरता छान उत्तरे दिली त्यामुळे मुलांना परिक्षा आहे असे वाटलेच नाही.

## वर्तन समस्या कार्यवाहीचे टप्पे

दोन वर्षानंतर प्रत्यक्ष शाळा सुरु झाली. शाळा सुरु झाल्यावर मुलांमध्ये काही वर्तन समस्या आढळून आल्या. त्या वर्तन समस्या कमी करून मुलांना शाळेच्या प्रवाहात पुन्हा घेऊन येण्यासाठी वर्तन समस्या कमी करून त्यावर पर्याय म्हणून खालील उपाय घेण्याचे ठरविले . त्यासाठी जाई मोठ्या गटातील मुलांच्या पालकांशी चर्चा केली व खालील उपाय घेण्यास सुरुवात केली. याची माहिती सविस्तर खालील प्रमाणे -

**नवोपक्रम : अशी घडली मुले**

| अ. क्र | वर्तन समस्या | दिनांक | उपाय /खेळ | निरीक्षण |
|---|---|---|---|---|
| **जुलै** | रागीटपणा<br>चिडखोरपणा<br>चंचलता/ अस्थिरता | १/७/२०२२<br>४/७/२०२२<br>११/७/२०२२<br>१८/७/२०२२<br>२५/७/२०२२ | शांती पाठ<br>ओमकार<br>विठ्ठलयोग | एकाग्रता वाढते<br>शांत बसण्याची सवय<br>एकाग्रता वाढीस, उत्साह वाढतो. |
| | परावलंबी<br>चिडखोरपणा<br>एकलकोंडेपणा<br>इतरांच्या वस्तू घेणे<br>स्थूलता<br>/आळशीपणा<br>बुजरेपणा | ६/७/२०२२<br>९/७/२०२२<br>१३/७/२०२२<br>१६/७/२०२२<br>२०/७/२०२२<br>२३/७/२०२२<br>२७/७/२०२२<br>३०/७/२०२२ | वस्तू ओळखणे.<br>स्वतः चे गुण सांगणे.<br>ओमकार टाळ्यांचे प्रकार.<br>मैदानी खेळ.<br>गप्पा मारणे.<br>स्वतःच्या वस्तू ओळखणे.<br>मैदानी खेळ .<br>गप्पा मारणे .<br>बैठे खेळ | स्वावलंबन , भाषा विकास .<br>स्वमत निर्माण करणे .<br>एकाग्रता वाढीस, उत्साह वाढ.<br>खेळा विषयी आवड निर्माण होते. भाषा विकास.<br>निरीक्षण शक्ती वाढते.<br>लवचिकता येते, प्रेरणा मिळणे .<br>भाषा विकास होतो शब्द संग्रह वाढतो, शारीरिक क्षमता वाढ, इतर मुलांशी बोलण्याची सवय होते. |
| **ऑगस्ट** | रागीटपणा<br>चिडखोरपणा<br>चंचलता/ अस्थिरता | १/८/२०२२<br>८/८/२०२२<br>२२/८/२०२२<br>२९/८/२०२२ | शांती पाठ<br>ओमकार<br>विठ्ठलयोग<br>बैठे खेळ | एकाग्रता वाढते<br>शांत बसण्याची सवय<br>एकाग्रता वाढीस, उत्साह वाढतो. |
| | एकलकोंडेपणा<br>परावलंबी<br><br><br>स्वमत नसणे<br>एकलकोंडेपणा<br><br><br>रागीटपणा<br><br><br>अस्थिरता / चंचलता<br>स्वमत नसणे<br>चिडखोरपणा | ३/८/२०२२<br>६/८/२०२२<br><br><br>१०/८/२०२२<br>१३/८/२०२२<br><br><br>१९/८/२०२२<br><br><br>२०/८/२०२२<br>२४/८/२०२२<br>२७/८/२०२२ | एक हात बांधून खेळ<br>दुसऱ्याच्या वस्तू(पाट्या) ओळखणे.<br><br>दुसऱ्यांचे दोष सांगणे.<br>मैदानी खेळ<br><br><br>विठ्ठल योग. फळे /फुले/वाहने - नावे सांगणे.<br><br>स्मरण खेळ.<br>दिवा लावून एकटक बघणे<br>आवडीचा खेळ खेळणे | सहकार्याची भावना<br>स्वावलंबन,वस्तू आणण्याचा आनंद<br><br>स्वमत निर्माण होणे<br>लवचिकता येते, संघभावना वाढीस<br><br>उच्चार स्पष्ट होतात, जिभेचा व्यायाम<br><br>एकाग्रता वाढीस,<br>शांत बसण्याची सवय<br>आनंद, भाषा विकास |

**नवोपक्रम : अशी घडली मुले**

| | | | टाळयांचे प्रकार | उत्साह निर्माण होतो |
|---|---|---|---|---|
| **सप्टेंबर** | चिडखोरपणा<br>रागीटपणा<br>अस्थिरता / चंचलता | ५/९/२०२२<br><br>१२/९/२०२२<br>२७/९/२०२२ | शांती पाठ<br>ओमकार<br>विठ्ठलयोग<br>बैठे खेळ | शांत बसण्याची सवय<br>एकाग्रता वाढीस, उत्साह वाढतो.<br>बुद्धीला चालना, लक्ष केंद्रीत |
| | एकलकोंडेपणा<br>चिडखोरपणा<br><br>परावलंबी<br>एकलकोंडेपणा<br>स्वमत नसणे<br><br>आहार<br>उच्चार दोष<br>एकलकोंडेपणा<br><br>एकलकोंडेपणा | १/९/२०२२<br>३/९/२०२२<br><br>७/९/२०२२<br>१०/९/२०२२<br>१४/९/२०२२<br><br>१७/९/२०२२<br>२१/९/२०२२<br>२४/९/२०२२<br>२८/९/२०२२<br>३०/९/२०२२ | पाय बांधून मैदानी खेळ<br>पौष्टिक डबा<br>बैठे खेळ<br>स्वतःच्या वस्तू ओळखणे<br>मैदानी खेळ<br>वस्तू मांडून खेळ<br><br>पौष्टिक डबा<br>विठ्ठल योग<br>'र ' चा उच्चार वारंवार करून घेणे<br>शिवाजी म्हणतात मैदानी खेळ | संघभावना निर्माण<br>शारीरिक वाढ, चिडचिडेपणा कमी पौष्टिक खाण्याची आवड<br>स्वावलंबन, लक्ष केंद्रीत<br>संघभावना वाढीस आनंद<br>आवड निर्माण होणे, स्वमत निर्माण होणे<br>पौष्टिक पदार्थ खाण्याची आवड<br>शांत बसण्याची सवय<br>ऐकण्याची वृत्ती निर्माण होणे<br>उच्चार स्पष्ट होण्यास मदत<br>लक्ष केंद्रित होणे |
| **ऑक्टोबर** | रागीटपणा<br>चिडखोरपणा<br><br>एकलकोंडेपणा<br>स्वमत नसणे | ३/१०/२०२२<br>१०/१०/२२<br><br>२५/१०/२२<br>६/१०/२०२२ | शांतिपाठ<br>पौष्टीक पदार्थांची माहिती देणे<br>मैदानी खेळ<br>आवडीचे खेळ खेळणे | एकाग्रता वाढते<br>नखे खाणे यासारखे दोष कमी होण्यास मदत<br>संघभावना वाढीस आनंद<br>स्वतःचे मत निर्माण होणे , |
| | संघभावना वाढीस<br><br><br><br><br>उच्चार दोष | ८/१०/२०२२<br>११/१०/२२<br>१५/१०/२२<br><br><br>१९/१०/२२ | एकारिंगेतून चालणे<br>मैदानी खेळ<br>माती काम - किल्ला तयार करणे<br><br>गप्पा मारणे | बोलके होणे, संघभावना वाढीस<br>सहकार्याची भावना<br>लवचिकता, सहकार्याची भावना<br>किल्ला तयार केलेल्याचा आनंद, मातीत खेळण्याचा आनंद<br>उच्चार स्पष्ट होण्यास मदत, एकमेकांबद्दल प्रेम आपुलकीची मैत्रीची भावना वाढीस |

## उपक्रमासाठी इतरांची मदत

- हा उपक्रम घेण्यासाठी संस्थेची सर्वात मोठी मदत झाली.
- हा उपक्रम करताना मुलांमधील वर्तन समस्या दूर करण्यासाठी पालकांनी खूप सहकार्य केले.
- वर्तन समस्या व हा नवोपक्रम ज्या बालकांसाठी केला त्या बालकांची व त्यांच्या पालकांची मोलाची मदत झाली.
- हा उपक्रम घेत असताना शाळेचे कार्यालयीन कामकाज श्री महेंद्र जोशी यांची मदत झाली.
- जनकल्याण प्रतिष्ठाणचे अध्यक्ष श्री शिरीष गोडबोले, उपाध्यक्ष श्री तुकाराम चव्हाण, सचिव श्री अनिल कुलकर्णी, विश्वस्त सौ. भागवत मॅडम, प्रकल्प प्रमुख श्री रमेश फणसळकर सर, मार्गदर्शिका सौ. रेखा फणसळकर, प्राथमिकच्या विभागाच्या मुख्याध्यापिका सौ रुपाली तोडकर, शिक्षिका अंबोली फणसळकर यांनी या उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले.

माझे घरचे व पती, मुले यांनी मदत केली .

# ७.नवोपक्रम फोटो / अभिप्राय

## उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे

वंदना - विद्यार्थी भावनांची ओळख



दुसऱ्या विद्यार्थ्यांचे पालक मुलांशी गप्पा मारताना




संस्कारक्षम पिढी - घरातून मिळालेला प्रतिसाद



नवोपक्रम : अशी घडली मुले

वस्तू ओळख - आपली व
इतरांची वस्तू देव - घेव करणे




विद्यार्थी नखे खाण्याची सवय



सुरुवातीला रडत येणारी मुले आनंदाने शाळेत येऊ लागली.



# पालकांचे अभिप्राय



नांव - सौ. सुजाता सचिन पवार
पाल्याचे नांव - स्वरा सचिन पवार
गट - जाई मोठा गट
दि. १७/१०/२०२२.

प्रति,
मा. मुख्याध्यापिका,
सरस्वती शिशुवाटीका
कराड.

विषय :- पाल्यामधील होणाऱ्या सकारात्मक बदलाबाबत.


आदरणीय बाई,

उपरोक्त विषयास अनुसरुन मी सौ. सुजाता सचिन पवार आपणा सर्वांचे मनापासून धन्यवाद मानते. कारण माझ्या मुलीला शाळेत घातलेपासून आत्तापर्यंत तिच्यामध्ये खूपच छान, चांगले बदल घडून आले आहेत.

शाळा सुरु झाली तेव्हा माझी मुलगी खूप रडायची, बोलायची नाही, एकटी रहायची, घाबरायची. परंतु आज अखेर मी तिच्यातील बदल पाहीला व मला तिच्यातील फरक जाणवला. तिच्यामध्ये खूप अमुलाग्र बदल झालेला मला दिसून आला.

शाळेत घेतले जाणारे विविध उपक्रम मग त्यामध्ये शुभंकरोती, ओमकार, ओरिगामी, कापसाच्यापासून चित्र बनवणे, नारळाच्या करवंटीपासून वस्तू बनवणे, बांगड्यापासून तोरण बनवणे, इतर घेतले जाणारे उपक्रम, स्पर्धा, खेळ, गाणी, भजन, वेळोवेळी साजरे होणारे सण, योगसने व डॉ. तपासणी अशा विविध उपक्रमाद्वारे माझ्या पाल्यामध्ये खूप छान बदल घडून आला आहे.

इतर शाळांमध्ये देखील विविध



उपक्रम होतात परंतु ते घरुन करुन आणायला सांगतात. मग पालकच ते बनवून देतात. परंतु आपल्या शाळेत ते मुलांना शिकवतात व त्यांच्याकडून करुन घेतात. त्यामुळे त्यांची एकाग्रता वाढते.

माझी मुलगी बाईंचा प्रत्येक शब्द आत्मसात करण्याचा प्रयत्न करते. रोज उठल्यावर थोडा व्यायाम करते. ब्रश करते, आंघोळ करुन आल्यावर देवाला नमस्कार करते. स्वतःच आवरताना विशेष लक्ष देते. दूध पिते, दफ्तर भरणे, डबा, पाण्याची बाटली या गोष्टी स्वतः लक्ष देऊन भरते. शाळेतून आल्यावर चप्पल स्टॅण्डवरती ठेवणे, डबा-पाण्याची बॉटल काढून ठेवणे, कपडे हँगरला अडकवणे, हातपाय धुणे या चांगल्या सवयी लागी आहे.

रोज न चुकता संध्याकाळी देवासमोर शुभंकरोती व अथर्वशीर्ष म्हणते. शाळेतील प्रत्येक ॲक्टीव्हीटी घरी करुन दाखवते. सर्वांशी गप्पा मारते.


पूर्वी जेवताना मोबाईल पहायला लागायचा परंतु शाळेत सांगितलेपासून ती मोबाईल कसलाच पहात नाही व आम्हाला पण पाहू देत नाही. सर्व भाज्या खाते व हाताने जेवते. जेवण झाल्यावर ताटला नमस्कार करते.

शाळेतून रहायला तिला बिलकुल आवडत नाही. तिची पाठांतर करण्याची कॅपॅसिटी वाढली आहे. याचे सर्व श्रेय कुलकर्णी मॅडम, घोडके मॅडम व उपक्रम राबवणाऱ्या कोळेकर मॅडम यांना जाते.

मला व माझ्या पाल्याला आपली शाळा खूप-खूप आवडते. मुलांची बालमने जाणून त्यांच्या मध्ये बदल घडवून आणणाऱ्या या सर्व गुरुवर्यांना कोटी-कोटी नमस्कार.

धन्यवाद।

आपली विश्वासू पालक
(सौ. सुजाता सचिन पवार)




नमस्कार.

माझे नाव आनंद परशुराम माळी. माझ्या पाल्याचे नाव शाल्वी आनंद माळी असे आहे. ती जाई मोठा गट या वर्गामध्ये शिकत आहे. आम्ही तुमच्या शाळेबद्दल माहिती आमच्या शेजाऱ्याकडून मिळाली म्हणुन आम्ही तीला तुमच्या शाळेमध्ये प्रवेश घेतला. आणि तेव्हा पासुन माझ्या पाल्यामध्ये खुप बदल झाला आहे. तीचे चालणे, बोलणे, वागणे यामध्ये खुप बदल झाला आहे. तसेच भजन, प्रार्थना, कविता, श्लोक हे ही तीला पाठ झाले आहेत. ती आता दररोज संध्याकाळी देवापुढे दिवा लावुन शुभंकरोती म्हणते. तसेच शाळेतुन आल्यानंतर कपडे बदलणे, हात-पाय धुणे, जेवण करणे, शाळेचा अभ्यास करणे, घरकामात मदत करणे, मोठ्यांशी आदराने बोलणे, वयस्करांना मदत करणे इ. असे अनेक संस्कार झाले आहेत. अशाप्रकारे तीच्यामध्ये खुप चांगला बदल झाला आहे.

तसेच तीला तुमच्या शाळेमध्ये घेतलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांमुळे आपल्या हिंदू सणांची माहिती मिळाली आहे. व ती खुप चांगल्या प्रकारे ती साजरा ही करत आहे. तीच्या या बदलामुळे आम्ही सर्व जण खुप आनंदी आहोत. आमच्या सर्व परीवाराकडून तुम्हाला व तुमच्या शाळेला धन्यवाद देतो व आभार मानतो. व असेच संस्कार आमच्या पाल्यावर व्हावेत ही ईच्छा आहे व तीची अशीच प्रगती व्हावी व ती तुमचे व तुमच्या शाळेचे नाव मोठे करावे अशीच प्रार्थना आहे.

आनंद परशुराम माळी.





अभिप्राय


सरस्वती शिशुवाटिका या आपल्या शाळेत 'भाग्यश्री कोळेकर' बाईंनी नवोपक्रम या उपक्रमा अंतर्गत मुलांकडून विविध उपक्रम करून घेतले. जसे की, नारळाच्या करवंटीपासून वस्तू तयार करणे, बांगडीचे तोरण करणे, विविध प्रकारचे खेळ खेळणे, रांगोळी काढणे इ.

या सर्व उपक्रमांमुळे मुले नवनवीन प्रकारच्या गोष्टी करून बघू लागली. स्वतःच्या वस्तू शाळेतून घरी आल्यावर व्यवस्थित ठेवणे. व बाईंनी शिकवलेले खेळ जवळच्या इतर मित्र-मैत्रिणींना सांगू लागले. त्यामुळे मुले मोबाइल व टि.व्ही या गोष्टीपासून थोडी दूर जाऊन खेळ व घरात आईला थोडी मदत करणे ह्यामध्ये रमू लागली. तसेच देवपूजा व शुभंकरोतिचे नित्य पठण करू लागली.

अशा या विविध उपक्रमांद्वारे आपल्या शाळेतील बाई मुलांना नेहमीच नवनवीन गोष्टी शिकवत असतात. या सर्व उपक्रमांतून मुलांची थोडी एकाग्रता वाढली. असेच उपक्रम सतत राबवल्याने मुलांची खूप छान प्रगती होईल. म्हणूनच बाईंच्या या उपक्रमाचे आम्हा सर्व पालकांकडून खूप स्वागत आणि बाईंना खूप खूप धन्यवाद!

आपली विश्वासू
सौ श्रेया श्रीकांत गोरे.
(काव्याची आई)
S. S. Gore

# वर्गशिक्षकांचा अभिप्राय



सरस्वती शिशुवाटिका, कराड

"अशी घडली मुले" – सौ. भाग्यश्री महेश कोळेकर

माझ्या वर्गावर सौ. भाग्यश्री कोळेकर यांनी सर्व उपक्रम घेतले. यात खेळ, ॐकार साधना, विविध कला कौशल्य, जीवन व्यवहार अशा सारख्या अनेक विषयांतून मुलांना काम करण्याची, एकमेकांना मदत करण्याची, शुभंकरोती सारख्या छोट्या छोट्या श्लोकांतून त्यांच्या बोलण्यातील स्पष्टता जाणवून दिसून आली. जीवनव्यवहारातील गोष्टी लागू करण्यासाठी मुले फार उत्सुक होती. बांगडीचे तोरण करताना मुले पटापट बांगडीत दोरा गुंडाळत होती. अशा सारख्या विविध उपक्रमांतून आमच्या जाई मोठा गट या वर्गातील मुले बाई वर्गात आल्या आज नवीन काय शिकवणार ह्यातील त्यांच्या उत्सुकतेने नवीन काही शिकण्याची वृत्ती जोपासली गेली.

असेच नवनवीन उपक्रम आमच्या शाळेत वारंवार होत असतात त्यामुळे मुलेही खूप आनंदी व क्रियाशील आणि हसरी असलेली दिसून येतात. असेच नवनवीन उपक्रमांतून मुलांमध्ये बदल घडत जावोत हीच सदिच्छा व त्यांना नवोपक्रमास हार्दिक शुभेच्छा!

आपली विश्वासू
सौ. अनघा अनंत कुलकर्णी
(जाई मोठा गट)
वर्गशिक्षिका.


सरस्वती शिशुवाटिका

नमस्कार

माझे नाव सौ माधुरी कांबळे मी जाई या गटाला शिकवत आहे आमच्या वर्गावर सौ. भाग्यश्री कोळेकर बाई यांनी "अशी घडली मुले" या उपक्रमासाठी वेगवेगळे खेळ, हस्तकला, साधना, जीवन व्यवहार, ॐकार असे नविन उपक्रम राबवले. लॉकडाउन नंतर मुलांच्या मध्ये फारच अस्थिरता निर्माण झाली होती. शाळा चालू झाली तेव्हाची मुले व आता परिक्षा घेताना असणारी मुले यात खूपच फरक पडलेला दिसून आला. कोळेकर बाई यांनी घेतलेल्या वेगवेगळ्या उपक्रमामुळे मुलांच्या मध्ये आमुलाग्र असा बदल झाला. मुले एकाग्र झाली त्यांच्यामध्ये स्थिरता आली. त्यामुळे आम्हाला परिक्षा घेणे सोपे झाले.

मुलांना नवनिर्मितीचा आनंद मिळाला मुले खूप उत्साही होती. एक-दोन उदाहरण अशी आली मुले आजारी असताना सुध्दा शाळेत येण्याचा आग्रह करत होती. या कोळेकर बाईंच्या उपक्रमामुळे मुलांना शाळेची ओढ वाढली तसेच शाळेत ज्या चांगल्या सवयी सांगितल्या त्याप्रमाणे मुले घरी हि करू लागली त्यामुळे पालक वर्ग हि खुश आहे. यामुळे आम्हाला मुलांनी स्वतः क्रियाकलाप करण्यात आनंद मिळतो व ते नविन गोष्टी लवकर आत्मसात करतात हे लक्षात आले. कोळेकर बाईंच्या या उपक्रमामुळे वर्गात खूप बदल घडून आले.

धन्यवाद

आपली विश्वासू

# ८.नवोपक्रमाची कार्यपद्धती

## पूर्वः स्थितीचे निरिक्षणे व त्यांच्या नोंदी -

३ ते ५ हे वय अत्यंत संवेदनक्षम असते या वयात बालकांची वाढ व विकास झपाट्याने होत असते ही वाढ व विकास होत असताना मुलांच्यात वर्तन समस्या जाणवू लागल्या. २ वर्ष कोरोना मध्ये बालके घराबाहेर पडली नव्हती त्यामुळे मुलांच्यात एकोलकोंडेपणा, लाजरेबुजरेपणा, दिसून येत होता. मुलांच्यात एकाग्रता नव्हती.

- मुलांच्यातील वर्तन समस्या, अस्थिरता कमी करून मुलांचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे यासाठी हा उपक्रम करण्यात आला.
- लॉकडाऊनच्याा काळात पालक आपल्या पाल्याची अधिक काळजी. घेताना दिसले. मुलांना काही करू देत नसल्यामुळे मुल तासनतास टिव्ही मोबाईल समोर बसल्यामुळे मुलांच्यात आळशीपणा वाढलेला दिसला.
- मुले लाडावलेली व लहान आहेत, त्यांना कस काही काम करता येईल त्यामुळे स्वतः पालक सगळी कामे करत असल्यामुळे मुले परावलंबी बनली होती.
- टिव्हीतील कार्टून, गेम खेळल्याने मुलांच्यात टिव्हीतील चित्रे हालतात. त्याप्रमाणे चंचलता मुलांच्यात फार होती. शाळेत कार्टून प्रमाणे वर्तन करत होती.
- मुले कमी बोलत होती. बोलायला (संवाद) करायला घाबरत होती त्यामुळे मुलांच्यात शब्दसंपत्ती फार कमी होती, बोलताना लाजरेबुजरेपणा होता.
- पालकांना आपले मुल लहान वाटायचे त्यामुळे पालक मुलांच्या वस्तु छोटी छोटी कामे सुद्धा स्वतः करायचे.
- पालक दप्तर स्वत: पाठीला लावून मुलांना उचलून वर्गापर्यंत आणायचे. वर्गात दप्तर, चप्पल स्वतः जागेवर ठेवायचे.
- पालकांच्या मते मुले टिव्ही, मोबाईल लावल्या शिवाय खातच नाहीत. ही वारंवार तक्रात करत होते. पालक सारखे म्हणायचे मुल ऐकत नाहीत.
- स्वावलंबन, स्वच्छता, दुसऱ्याची वस्तु न घेणे, बोलणे, एकाग्रता वाढवणे. हया सवयी लहान पणापासून लागायला हव्यात तर त्याचा मोठेपणा फायदा होतो.
- बालकांच्यातील आळशीपणा, चंचलता, परावलंबन, दुसऱ्याची वस्तू न घेणे इ. समस्या दूर करणे. व मुलांचा सर्वांगीण विकास करणे हा माझ्या नवोपक्रमाचा हेतू होता.

## कार्यवाही दरम्यान निरिक्षणे व माहिती संकलन

- मुलांच्यातील वर्तन समस्या कमी होवून मुलांचा हळूहळू सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली.
- शांतीपाठ, ॐ कडे पाहणे, दिव्याकडे एकटक पहाणे यामुळे मुलांची एकाग्रता होऊ लागली. मुलांच्यातील चिडचिडेपणा, रागीटपणा कमी झाला.
- मैदानी खेळामुळे, वर्गातील खेळामुळे वर्तन समस्या कमी होऊन मुलांचा शारिरीक, मानसिक, भावनिक, बौध्दिक विकास होण्यास मदत झाली.
- मुलांच्यात स्वमत निर्माण झाले. मुले स्वावलंबी बनली.
- घरी रोज संध्याकाळी शुभंकोरती पालक घेऊ लागले व स्वतः ही त्यांच्या बरोबर म्हणू लागले.
- मुले स्वतःच्या व इतरांच्या वस्तू ओळखू लागली व कुणाची वस्तू राहीली तर लगेच परत देवू लागली.
- जाई गटातील मुलांनी व पालकांनी सांगीतल्याप्रमाणे घरी ही हा उपक्रम घेतल्याने मुलांची सर्व बाजूंनी प्रगती झाली. याचा परिणाम परिक्षेसाठी उत्तरे देताना दिसून आला.
- मुलांचे अथर्वशीर्ष प्रार्थना भजन श्लोक इत्यादी छान पाठ झाले. मुले धाडसाने बोलू लागली. उच्चार सुधारले. मुलांच्यात धिटपणा वाढला. मुले पाठांतर करु लागली.
- दोघांनी मिळून केलेले काम पूर्ण करणे. चित्रपूर्ण करणे यामुळे संघभावना वाढीस लागली.
- मुले गप्पांमध्ये सहभागी झाल्याने मुले बोलकी झाली. लाजरे बुजरेपणा कमी झाला.
- भितीमुळे मुले नखे खायची मुलांना वेळोवेळी प्रोत्साहन, शाब्बासकी दिल्याने भीती कमी होऊन. ही सवय कमी झाली.
- मुले हळूहळू स्वतःच्या वस्तू स्वतः ठेवू लागली.
- मुल पालकांनाही स्वतः च्या वस्तू जागेवर ठेवण्यास सांगू लागली.

## उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षण

- वर्तन समस्या कमी होऊन मुलांची चौफेर, प्रगती होऊ लागली.
- मुलांच्यातील लाजरेबुजरेपणा कमी होऊन मुझे बोलती झाली.
- मुले घर व्यवस्थित ठेवण्यासाठी आई बाबांना मदत करू लागली.
- मुले टिव्ही मोबाईल बघत जेवत होती त्याचे प्रमाण हळू हळू कमी झाले. व मुलेशाळेतील गमतीजमती सांगून जेवण जेवू लागली.
- मुलांच्यात शाळेची आवड निर्माण झाली. त्यांमुळे मुले हसत खेळत आवडीने बाई हे मी करू, मी करणार, म्हणून नवनवीन गोष्टी आवडीने करू लागली.


- मुलांच्या नवनवीन कल्पना ही सांगू लागली . त्यामुळे त्यांच्यात कल्पना शक्तीला वाव मिळाला.
- मुले बाईनी सांगितलेल्या गोष्टी, माहिती ऐकून मुले घरात ही आई बाबांना म्हणायची आमच्या बाईंनी हे सांगितल तसच करायच असत एवढा मुलांचा बाईंवर विश्वास होता.
- मुलांचे एक हात, पाय बांधून खेळ घेतल्यामुळे मुलांच्यात सहकार्याची भावना वाढीस लागली व मिळून काम करणे सवय लागली.
- मुलांच्या छोट्या छोटा कामामुळे, वस्तू जागेवर ठेवल्यामुळे मुलांना पटकन वस्तु सापडु लागल्या व पालकांचे काम हलके झाले.
- जाई गटातील मुलांच्या बाई परिक्षा घेताना मुलांचे लक्ष बाई काय विचारतायत याकडे असल्यामुळे मुलांनी उत्तरे छान दिली. यामुळे मुलांना आपली परिक्षा आहे असे वाटले नाही.
- मुलांच्यात प्रगती होत आहे हे पाहुन पालकांना खुप आनंद वाटू लागला व मुलांना या शाळेत घातल्याचे सार्थक झाले.
- मुलांच्यातील वर्तन समस्या दूर होऊन मुले शाळेच्या प्रवाहात पुन्हा आली.

## कार्यवाहीत झालेल्या अडचणी

- मूले पहिल्यांदा शाळेत येणार होती ती आल्यानंतर कुणाशी बोलतच नव्हती. फक्त तोंडाकडे पहात होतो.
- 2 वर्षे मुलांना शाळा या माहितच नव्हत्या. त्यामुळे मुले शाळेच्या प्रवाहात येणास वेळ लागला.
- मुले स्वतःच्या वस्तू ओळखत नव्हती जागेवर ठेवत नव्हती त्या लवकर मिळत नसल्याने शाळेत यायला उशिर व्हायचा.
- मुलांना मैदानावर खेळायला सोडल्यावर मुल लगेच थकून जायची बाई बास वर्गात जाऊया म्हणून लगेच बसायचीत.
- मुल शु आल्यावर स्वतःची पँट काढत व घालत नव्हते. काकूंना सांगत असत किंवा पॅटमध्येच शु करत होती.
- नेहमी मोबाईलवर दिसणा-याबाई, मुले त्या प्रत्यक्ष दिसल्यावर मुले तोंडाकडे नुसते पहात होती. एकमेकांच्यात मिक्स होत नव्हती.
- पालकांच्या पाठीला दप्तर तर काही पालक तर मुलांना उचलून वर्गापर्यंत आणत होती.
- टीव्ही, मोबाईल पहात डब्बा खायची सवय असल्यामुळे मुल शाळेत डब्बा खात नव्हती बाई  सगळा डब्बा संपवायला लावतात म्हणून डब्बा खुप सांडायची.
- पालकांना त्यांच्या मुलाबद्दल काही सांगायला लागलो की त्यांचा आम्ही सांगतोय त्यावर विश्वास बसत नव्हता.

# माहितीचे विश्लेषण : आलेख


**पूर्वस्थिती**




| समस्या जाणवलेली वि. संख्या | समस्या नसणारे विद्यार्थी | |
|---|---|---|
| चंचलता, आळशीपणा - १० | एकाग्रता - २ | |
| चिडखोरपणा / रागीटपणा _ ८ | आत्मविश्वास २ | |
| परावलंबी, एकलकोंडपणा - ६ | स्वावलंबी -३ | एकूण -४३ |
| इतरांच्या वस्तू घेणे, नखे खाणे - ६ | चांगल्या सवयी २ | |
| उच्चार दोष, लाजरे /बुजरे-३ | बोलकी -१ | |

नवोपक्रम : अशी घडली मुले

**यशस्विता**




| समस्या कमी झालेली विद्यार्थी संख्या | सुधारणा झालेली विद्यार्थी संख्या |
|---|---|
| चंचलता - २ | एकाग्रता - १० |
| चिडखोरपणा / रागीटपणा २ | आत्मविश्वास ९ |
| परावलंबी - १ | स्वावलंबी -६ |
| इतरांच्या वस्तू घेणे - ३ | चांगल्या सवयी ५ |
| उच्चार दोष-१ | बोलकी -३ |

एकूण -४३

## ९.नवोपक्रम यशस्विता व फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार)

- खेळाच्या माध्यमातून समस्यावर उपाय काढले जात असल्यामुळे उपस्थिती चांगली राहून मुले आनंदाने शिक्षण घेत होते.
- वर्तन समस्या कमी करून पाठ्यपुस्तकासोबत मुलांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत झाली.
- स्वतःच्या व इतरांच्या वस्तू ओळखणे, जागेवर ठेवणे, आवडीचे खेळ खेळणे यामुळे मुले **स्वावलंबी** बनली.
- ओमकार शांतीपाठामुळे मुलांचातील चिडखोरपणा, चंचलता, रागीटपणा, आळशीपणा कमी होऊन मुलांचा सर्वांगीण विकास व एकाग्रता वाढीस लागण्यास मदत झाली.
- पाठांतराची हळूहळू सवय होऊ लागली.
- टाळयांचे, हास्यांचे प्रकार, मैदानी खेळ, उड्या मारणे घेतल्यामुळे मुलांच्यात कोणतेही काम करण्यास **उत्साह** निर्माण झाला.
- मुलांच्यातील एकलकोंडेपणा कमी होऊन मुले एकमेकाबरोबर खेळू, बोलू लागली. मुलांच्यात **सहकार्याची भावना** निर्माण झाली.
- मुलांच्यात स्वतःचे मत निर्माण झाले मुले स्वतःच्या आवडीचे खेळ निवडून खेळू लागली.
- वर्तन समस्यावर आधारित उपाय करण्यात आले. त्यामध्ये ४३ विदयार्थी सहभागी झाले. हा उपक्रम करत असताना सरासरी ९८ % उपस्थीती होती.
- मुलांच्यातील बदल पाहून मी केलेला नवोपक्रम यशस्वी झाल्यामुळे मला खुप समाधान वाटते.
- मी केलेले उपाय नक्कीच मुलांच्या वर्तन समस्या दूर करून मुलांच्यात एकाग्रता व मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत आहे हे पाहून याचा मला खुप आनंद आहे.

- काही मुले मातीला हात लावत नव्हती. त्या मुलांनी सुद्धा किल्ला केल्याचा आनंद मला आहे.
- एका पालकांना शाळा सुटताना सांगितले वेदस आज खुप शहाण्या सारखा वागला कुणाला मारले नाही डब्बा संपवला बाईचे ऐकतो. हे ऐकताच पालकांच्या तोंडातून पटकन शब्द आले . **"बाई ! आज घरी गेल्यावर तुकडा ओवाळून टाकतो."** तुम्ही केलेल्या कष्टाचे फळ आहे. त्याच्यात खरच खूप छान झालेल्या बदलामुळे मला माझा निवोपक्रम केल्याचे सार्थक झाले असे मला वाटते.

## फलनिष्पत्ती

- या उपक्रमाचा फायदा शिक्षक, पालक, व विद्यार्थी यांना झाला. मुलांमधील वर्तन समस्या कमी झाल्यामुळे मुले एकाग्र झाल्याने शिक्षकांना शिकवणे सोपे झाले व पालक आनंदी झाले.
- मुलांना बाहेरच्या व्यक्ती किंवा पाहुणे जर चॉकलेट, गोळया, बिस्कीट देत असताना मुले त्यांना लगेच म्हणतात. काका चॉकलेट, गोळया, बिस्कीट नको त्याऐवजी शेंगदाणे, फुटाणे, खजूर, शेंगदाण्याचा लाडू दया असे म्हणू लागली. यावरून मुलांच्यात पौष्टीक पदार्थांचे महत्व समजले हे लक्षात येते.
- मुले घरातील आजी - आजोबा, आई - बाबानां ही शुभंकरोती, ओमकार, डोळे मिटून शांत बसवू लागली. मुले चांगल्या व वाईट सवयी ओळखू लागली.
- मुलांना वस्तू जागेवर ठेवण्याची सवय लागली व घरातील इतरांनाही वस्तू जागेवर ठेवण्यास सांगू लागली.
- मुल रोज सकाळी चहा ऐवजी दूध आवडीने पिऊ लागली.
- जेवताना टिव्ही, मोबाईल ची सवय बंद झाली. व मुले छान सर्व पदार्थ खाऊ लागली.

# १०.समारोप

सन 2021-2022 मध्ये 'कोरोना नंतर आलेल्या वर्तन समस्या कमी करण्यासाठी पर्यायी मार्ग शोधले व 'अशी मुले घडली' हा उपक्रम पूर्ण होण्यास मदत झाली.
कोरोना नंतर आलेल्या विद्यार्थ्यांच्यातील समस्यांवर आधारित उपाय करण्यासाठी हा मी केलेला अत्यंत प्रामाणिक प्रयत्न आहे. खर तर हा माझा प्रयोगच आहे. असे मी मानते.

विद्यार्थ्यांच्या वरील समस्या शोधताना पालकांच्या भावनांचा व उत्साहाचा, सहकार्याचा वापर करत 'अशी माझी मुले घडली' मुलांन संस्कारक्षम बुद्धिमान क्रियाशील बनवण्यासाठी सुधारणा करत मी या प्रयोगाद्वारे जी यशस्वीता प्राप्त केली त्याने मला शिक्षक असल्याचा अभिमान वाटू लागला.

बालके आणि प्राणी समजण्यासाठी खूप अवघड आहे. पण निरीक्षणाने व प्रेमाने सहज समजता येतात हे मी शिकले.

**'अशी घडली मुले'** द्वारे मुले घडविताना मी ही नकळत घडले गेलेच की अशी माझी भावना आहे. माझ्यातील काही समस्यांमध्ये सुधारणा झाल्या आणि 'मी ही घडले.' शिकविता शिकविता शिकताही आले हे माझे यश म्हणते.

**"अशी घडली मुले"** या नवोपक्रमाची ही कार्यपद्धती सर्वांपर्यंत पोहचावी हा माझ्या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

# ११.संदर्भसूची व परिशिष्टे

शिशुवाटिका तत्व व्यवहार - इंद्रमती काटदरे

वर्गपुस्तिका (वंदना पुस्तिका) - वंदना फडके, वृषाली हिंगणे

Youtube  माध्यमाचा वापर

धन्यवाद !!!